**स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com

---

**प्रेसनोट** दिनांक:- ०२/०८/२०१८

# वणी येथील बलात्काराचे गुन्हयातील आरोपीस कारावासाची शिक्षा

---

सन २०१५ मध्ये माहे मे महिन्यात वणी पोलीस ठाणे हद्दतील चौसाळे गावातील एक पिडीत अल्पवयीन मुलगी तिचे शेतातील कामकाज करून सायंकाळचे सुमारास घरी येत असतांना आरोपी नामे लहु रघुनाथ बागुल याने तिस चाकुचा धाक दाखवुन शेतात नेवुन अनैसर्गिकरित्या बलात्कार केला होता. सदर बाबत वणी पोलीस ठाणेस । गुन्हा रजि. नंबर ७१/२०१५ भादवि कलम ३७६,३७७,५०६ सह पॉस्को कायदा कलम ४,१२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचे तत्कालीन तपासी अंमलदार **पोलीस निरीक्षक श्री.एम.डी खोडवे** यांनी गुन्हयातील आरोपींविरूध्द सबळ पुरावे गोळा करून, गुन्हा शाबीत होण्याचे दृष्टीने अतिशय चिकाटीने तपास करून दिनांक २६/०८/२०१५ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायालय कोर्ट नं. ८, नाशिक न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले होते.

सदर खटल्यात आज दिनांक ०२/०८/२०१८ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. पांडे सो. कोर्ट नं.८, नाशिक न्यायालयाने सदर गुन्हयातील आरोपींविरूध्द तपासी अंमलदार यांनी सादर केलेल्या सबळ पुराव्यास अनुसरून आरोपी नामे **लहु रघुनाथ बागुल, रा. चौसाळे, ता.दिंडोरी** यास दोषी ठरवुन **०३ वर्षे ०२ महिने कारावासाची शिक्षा** ठोठावली आहे. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता श्री. कापसे व कोर्ट पैरवी पोहवा सांगळे यांनी कामकाज पाहिले.

वरील गुन्हयातील तपासी अधिकारी व कर्मचारी यांनी गुन्हा शाबीत होण्याचे दृष्टीने केलेल्या उत्कृष्ट कामगिरी बद्दल नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.**,व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो** यांनी अभिनंदन करून बक्षीसपत्र जाहिर केले आहे.